डावी कडवी विचारसरणीने तीव्र स्वरुपात प्रभावित गडचिरोली जिल्ह्यासाठी विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.- एनएएक्स-०५१९/प्र.क्र.१००/विशा-१ब,
दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९.

वाचा- १) गृह विभाग, शासन निर्णय क्र.- एनएएक्स-०११८/प्र.क्र.२०/विशा-१ब, दि. २०/२/२०१८.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.- डीआयएस-०५१८/प्र.क्र.२०८/विशा-१ब, दि. १२/१०/२०१८.
३) गृह विभाग, शासन निर्णय क्र.- एनएएक्स-०७१८/प्र.क्र.२५३/विशा-१ब, दि. १/१/२०१९.
४) गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ.शा. पत्र क्र.- II-१८०१५/५१/२०१८-LWE-III, दि. ११/७/२०१९.

प्रस्तावना-

डावी कडवी विचारसरणीने तीव्र स्वरुपात प्रभावित झालेल्या गडचिरोली जिल्ह्याकरिता पायाभूत सुविधा व अन्य सुविधा यासाठी विशेष केंद्रीय सहाय्य (Special Central Assistance) या १००% केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत रु. ५१.६६ कोटी इतका निधी चालू आर्थिक वर्षात पूरक मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. उक्त अर्थसंकल्पित निधीपैकी ६०% रु. ३०.०० कोटी इतक्या निधीच्या वितरणास वित्त विभागाने मान्यता दिली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदरचा निधी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

डावी कडवी विचारसरणीने तीव्र स्वरुपात प्रभावित झालेल्या गडचिरोली जिल्ह्याकरिता सार्वजनिक पायाभूत सुविधा व सुविधा यामध्ये असणारी तफावत दूर करण्यासाठी विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत पूरक मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीपैकी रु. ३०.०० कोटी (अक्षर रुपये तीस कोटी मात्र) इतका निधी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या नावे सार्वजनिक क्षेत्रातील बँकेमध्ये उघडलेल्या खात्यात वर्ग करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदरचा निधी मागणी क्र. बी-१०, ४०५५ पोलीसांवरील भांडवली खर्च (००) २०७ राज्य पोलीस (००)(१२) नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यासाठी पायाभूत सेवा व सुविधा (४०५५ ०२७९) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. निधी वितरीत करण्यासाठी गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. २०/१२/२०१७ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करावी. तसेच योजनेसंदर्भात केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या आणि संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन निधी खर्च करण्यात यावा.

४. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना नियंत्रण अधिकारी तर त्यांच्या अंतर्गत आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्याने निधी कोषागारातून

आहरित करुन संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेल्या व जिल्हाधिकारी आणि जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांच्या नावे उघडण्यात आलेल्या बँक ऑफ इंडिया, गडचिरोली शाखा बचत खाते क्र. ९६४८१०११०००६४७०, IFSC Code BKID०००९६४८, MICR Code ४४२०१३२०३ या खात्यावर वर्ग करावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. २७६/१९/व्यय-७, दि. १६/८/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१८१४५०१११३२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Damodar Patil

Digitally signed by Vijay Damodar Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5254aa09c72b0eb445f264826ab10bb4279 3fc26e3838113296e7ff812051f6f, cn=Vijay Damodar Patil
Date: 2019.09.19 16:34:53 +05'30'

(विजय पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे व ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (अ.व सु.), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. महालेखापाल-१ / २ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर.
१०. अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. जिल्हाधिकारी, गडचिरोली.
१२. पोलीस अधिक्षक, गडचिरोली.
१३. जिल्हा नियोजन समिती, गडचिरोली.
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, गडचिरोली.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
१६. वित्त विभाग, व्यय-७, अर्थोपाय, अर्थ-११, मंत्रालय, मुंबई.
१७. नियोजन विभाग, कार्या. १४६१, मंत्रालय, मुंबई.
१८. अर्थसंकल्प-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवडनस्ती (वि.शा. १ब) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.